# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - 413 255, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: affiliation@sus.ac.in विस्तारित क्र.: १२२




**संलग्नता विभाग**

**जा. क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/** 2947 **दिनांक:** 1 9 APR 2025

प्रति,

**मा. प्राचार्य/संचालक/सचिव,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी. या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाकरिता पूर्वीप्रमाणे महाविद्यालयातील प्रत्येक विषयाकरिता संलग्निकरणाचे नुतनीकरणाचे प्रस्ताव शुल्क आकारण्याबाबत...**

**संदर्भ :** दिनांक १७/०१/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र. १३ वर पारित ठराव.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, प्रस्तुत कार्यासनाच्या दिनांक २२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावरील नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी / संलग्निकरणाचा विस्तार / संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / निरंतर संलग्निकरण / महाविद्यालयीन नावातील बदल / महाविद्यालय बंद / अभ्यासक्रम बंद तसेच व्यवस्थापन हस्तांतरण करण्यासंदर्भातील प्रस्तावाबाबत मुद्दा क्र. १ ते ९ नुसार अवगत करुन विविध प्रकारचे शुल्क कळविण्यात आले होते.

तद्नंतर शासनाच्या शैक्षणिक धोरण २०२० (NEP २०२०) नुसार विषयात वाढ झाल्याने शुल्क आकारणे संदर्भात सदरची बाब दिनांक ११/१२/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विषय ठेवला असता, सदर विषयावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

" शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी. या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाकरिता पुर्वीप्रमाणे प्रत्येक विषयाकरीता संलग्नीकरण शुल्क आकारण्याचे सर्वानुमते ठरले, तरी सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली. "

उक्त पारित ठरावानुसार दिनांक २७/०१/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत क्र. १३ अन्वये विषय ठेवला असता, सदर विषयावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

"अधिष्ठाता मंडळाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी. या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाकरिता महाविद्यालयातील पूर्वीप्रमाणे प्रत्येक विषयाकरीता संलग्नीकरणाचे प्रस्ताव शुल्क आकारण्याबाबत केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. "

सबब, उक्त बाबीची आपल्या स्तरावरुन उचित नोंद घेवून योग्य ती कार्यवाही व्हावी, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

**(डॉ. उ. वि. मेटकरी)**
**उपकुलसचिव, संलग्नता विभाग**